

# क्विक हीलच्या उपक्रमाने शिक्षण संस्था, शिक्षक व विद्यार्थ्यांना केले सन्मानित

पुणे (दै. संध्या) : क्विक हील या जागतिक सायबर सिक्युरिटी सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आपल्या सीएआर शाखेच्या माध्यमातून आज त्यांचे 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्ड्स'चे पहिले पर्व आयोजित केले. शिक्षण संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी, विशेषत: समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता पसरवलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीम. अनुपमा काटकर आणि ६ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुणे एडिशनमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले.